मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,अकोला यांचे कार्यालय.

निविदा दरपत्रक मागविणे बाबत

जा.क्र/वित्त/ ९०७४ /२०२६
जिल्हा न्यायालय, अकोला
दिनांक : १२/०३/२०२६

प्रति,

सकत स्वह
जिल्हा न्यायालय अकोला

**विषय :— न्यायालयातील निकाली निघालेल्या प्रकरणांमधील फाडलेल्या कागदपत्रांची/फाईल्स तसेच इतर कागदपत्राची रद्दी विक्री करणे करीता निविदा मागविणेबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अकोला यांच्या दिनांक १२.०३.२०२६ रोजीच्या आदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, जिल्हा व सत्र न्यायालय, अकोला व अधिनस्थ असलेल्या दुय्यम न्यायालयातील निकाली निघालेल्या प्रकरणांमधील फाडलेल्या कागदपत्रांची रद्दी विक्री करण्यासाठी रद्दी विकत घेणा—या निविदाधारक/व्यापारी यांचे कडुन खालील नियम व अटी व शर्तीच्या अधिन राहुन (दरपत्रक)/निविदा मागविण्यांत येत आहेत.

**टिप :— १.न्यायालयातील प्रकरणांमधील फाडलेल्या कागदपत्रांची रद्दी विकत घेण्याकरीता रद्दीचे दर प्रति किलो सर्व करासह दर्शविण्यांत यावे.**

**२.न्यायालयातील प्रकरणांमधील फाडलेल्या कागदपत्रांची रद्दीची पाहणी ही जिल्हा अभिलेखागृह, जिल्हा न्यायालय, अकोला येथे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.३० ते ५.०० दरम्यान करावी.**

**३.रद्दीची मोजणी जिल्हा न्यायालय, अकोला येथे इलेक्ट्रानिक वजन काटयावर करण्यांत येईल इलेक्ट्रानिक वजन काटा हा निविदा मंजुर झालेल्या निविदाधारकचा राहील. तसेच वाहतुक खर्च निविदाधारकांस सोसावा लागेल. सदरहु रद्दीची मोजणी ही मा.न्यायीक अधिकारी यांचे समक्ष करण्यांत येईल.**

**४.निविदा सादर करतांना निविदाधारकाने स्वत:चे छायाचित्र असलेले आधारकार्ड/पॅनकार्ड किंवा वाहन चालविण्याचा परवाना भ्रमनध्वनीसह स्वसाक्षांकीत छायांकीत प्रत जोडणे अनिवार्य आहे.**

**५.तसेच दरपत्रक/निविदाचे बंद पाकिटावर "रद्दी बाबत निविदा "असे नमुद करावे तसेच सदरहू निविदा वि. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, रेल्वे स्टेशन रोड, अकोला ४४४००१ यांचे नांवाने दिनांक २३/०३/२०२६ रोजी पर्यत अथवा तत्पुर्वी सादर करावी. अंतिम दिनांकानंतर प्राप्त होणा—या निविदांचा विचार केला जाणार नाही.**

**६.निविदा प्रक्रियेचे संपुर्ण अधिकार माननिय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,अकोला यांनी राखून ठेवलेले आहेत.**

**अकोला**
**दिनांक:—१२.०३.२०२६**

**आदेशान्वये**

12/03/2026

**प्र अधिक्षक**
**वित्त विभाग, जिल्हा न्यायालय,अकोला**